Vol 4 Issue 7 Jan 2015

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

*International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

*Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-7 | Jan-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# *भारतीय संसदीय लोकशाही – संस्कृती, दिशा, दशा*

*मेघराज एकनाथ औटी*

सहायक प्राध्यापक,राज्यषास्त्र विभाग, एस. एस. जी. एम. कॉलेज,कोपरगाव, जि. अहमदनगर.

***सांराश*** :भारतीय लोकशाहीची संस्कृती, दिशा, दशा यांचा विचार करतांना आपणाला असे म्हणावे लागेल कि आज भारतीय लोकशाही पासष्ट वर्षाची होवुन गेली आहे व विविधतेत एकता हे बिरुद घेवुन ती आजवर सुखनैव नांदत आहे १९५० पासुन ते अत्तापर्यन्त अनेक विचारवंतानी भारतीय लोकशाहीच्या अंताची भाकीते मांडली पण या सर्व भाकीतांना खोटे ठरवत ती टिकुन आहे व या सदृश्य काही घडलेच नाही उलट आणिबाणी सारख्या आघातानंतरही काही जखमांसह ती सावरली सुध्दा आहे. कारण एका झटक्यात १९५० मध्ये भारतीयांनवर लोकशाही व्यवस्था अचानकपणे लादली गेलेली नाही.तर अनेक वर्षाच्या कालावधीनंतर भारतात लोकशाहीची संकल्पना उदयाला आलेली आहे.

***प्रस्तावना :***

पण मग भारतीय लोकशाहीत सर्व काही अलबेल चालले आहे का? तर अजिबात नाही जेव्हा जेव्हा आपन भारतीय लोकशाहीचा तिची संस्कृती, दिशा, दशा या अनुषंगाने विचार करतो, अभ्यास करतो तेव्हा आपणाला या संदर्भात काही टप्पे दिसतात. यात पहिला टप्पा हा ‘नेहरु कालखंडाचा’ असलेला पाहवयास मिळेल भारतीय संसदीय लोकशाहीची सांस्कृतिकदृष्टया पायाभरणी तशी इंग्रज राजवटीतच झालेली होती. स्वांतत्र्यप्राप्तीनंतर भारताचे पहिले पंतप्रधान म्हणुन पंडित जवाहारलाल नेहरु यांची निवड झाली व नेहरुंच्याच काळात खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाहीची सांस्कृतिक पायाभरणी झालेली दिसुन येते व या कळातच भारतात लोकशाही खऱ्या अर्थाने बहरली,रुजली व येथिल जनतेच्या अंगवळणी पडली. नेहरुंनी भारतीय लोकशाहीला खऱ्या अर्थाने सांविधानिक स्वरुप दिले तीत अनेक चांगले पांयडे पाडले यामुळेच भारतात लोकशाही रुजली. तिला अधिमान्यता देण्याचे, दिशा महत्वाचे कार्य याच कालखंडात घडले म्हणून नेहरुंच्या काळखंडाला भारतीय लोकशाहीच्या संस्कृतिचा सुवर्ण कालखंड म्हणुन ओळखला जातो. नेहरुंच्या नंतर अल्पकाल पंतप्रधान झालेले लाल बहाद्दुर शास्त्री यांनीही नेहरुंचीच तत्वे पुढे चालविली

त्यानंतर आक्रमक लोकनुरंजनवादी अशा पंतप्रधान ‘इंदिरा गांधींचा’ कालखंड सुरु झाला खरे तर या कालखंडात भारतात लोकशाही खऱ्या अर्थाने बहरत होती तिला गरज होती ती फक्त योग्य आकार व दिशा देण्याची पण इंदिरा गांधींच्या अतिमहत्वकांक्षी नेतृवाने लोकशाहीला योग्य दिशा देण्याऐवजी त्यांनी लोकशाही मुल्यांना पायदळी तुडविण्यातच खरी धन्यता मानली या काळात भारतात लोकशाहीच्या मुखवटयाखाली हुकूमशाहीच नांदत होती. या कालखंडात राज्यघटनेतही अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या. खरे तर लोकशाहीव्यवस्थेत बदल हे सावकाशपणे व सहमतीने होणे अपेक्षीत असते पण इंदिरा गांधींनी लोकशाहीच्या मुल्यांनाच हरताळ फासण्याचे कार्य केले त्यांनी १९७५ ला लागू केलेल्या ‘आणिबाणीने’ तर लोकशाहीची पार दशाच करुन टाकली या कालखंडापासुन खऱ्या अर्थाने लोकशाहीची हानी होण्यास सुरुवात झाली. कारण इंदिरा गांधीनी लोकशाहीतील विकेंद्रीकरणाच्या तत्वालाच बाजुला करुन सर्व सत्तेचे आपल्या हाती केंद्रीकरण केले त्यांच्या कळात व्यक्तीकेंद्री राजकारणाला सूरुवात झाली त्यांनी कॉंग्रेस पक्षाची जी भक्कम संघटनात्मक बांधणी होती तीच नष्ट करण्याचे कार्य केले. जेव्हा इंदिरा गांधी - राजीव गांधी यांच्या राजकीय कारकिर्दीचा इतिहास लिहला जाईल, तेव्हा या मातापुत्रांनी लोकशाहीतील महत्वाच्या संस्था- न्यायव्यवस्था, प्रशासन, प्रसिध्दी माध्यमे, रिझर्व बँक, निर्वाचन आयोग यांचे खच्चीकरण करण्याचे, त्या कमकुवत करण्याचे धोरण अवलंबिले होते, याची नोंद घ्यावीच लागेल. यानंतर १९७७ ला झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत प्रथमच भारतीय जनतेने लोकशाही बासनात गुंडाळून ठेवणाऱ्या इंदिरा गांधींचा पराभव करुन आपण राजकीय दृष्टया प्रगल्भ झाल्याचे दाखवुन दिले हा खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाहीचाच विजय होता. आणिबाणीविरोधात ज्या पध्दतीने विरोधी पक्ष एकत्र आले आणि लोकाशाहीसाठी लढले ते

पाहून देशातील लोकशाही विषयी अनुकूल मत तयार झाले. या नंतर भारताचे सर्वात कमी वयात पंतप्रधान बनलेल्या 'राजीव गांधींचा' कालखंड सुरु झाला त्यांच्या राजकीय अप्रगल्भते मुळे भारतीय राजकारणात अनेक प्रश्नांचा उदय झाला आज जो 'राम मंदिराचा' प्रश्न वारंवार उद्‌भवतांना दिसतो आहे तो राजीव गांधींच्या लोकनुरंजनवादी राजकारणाचा उत्कृष्ट नमुनाच म्हणावा लागेल.कारण शहाबानो प्रकरणी न्यायालयाचा निर्णय रद्द करुन मुस्लीमांना खुश केल्या नंतर त्यांनी हिंदूना खुश करण्यासाठी आयोध्या येथे पुजा अर्चा करण्यास परवाणगी दिली व तेथूनच खऱ्या अर्थाने भारतीय राजकारणात धार्मिकतेचे स्तोम माजलेले दिसते. राजीव गांधींच्या काळात खरं तर भारतात विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासाला सुरवात झाली होती पण ते राजकीय मुत्सद्देगीरीत कमी पडले त्यामुळे भारतीय संसदीय प्रणालीला योग्य दिशा मिळण्याऐवजी तीची दशाच झालेली दिसुन येते. खरे तर राजीव गांधींचा लोकशाही व्यवस्था प्रबळ करण्याचा प्रमाणीक प्रयत्न होता. या नंतर सत्तेवर आलेल्या 'व्हि. पी. सिगांनी' 'मंडल आयोगाच्या' शिफारसीची अमंलबजावणी करुन आर्थिक दृष्ट्या दूर्बल घटकांना राजकीय प्रवाहात आणले या निर्णया मुळे जातीवाद भारतीय राजकारणात मध्यवर्ती बनला. १९९० चे दशक हे भारतीय लोकशाही व्यवस्थेच्या परीक्षेचे दशक मानावे लागेल या काळात भारतात अस्थिर शासनाचा कालखंड होता या कालावधीत अल्पकालीन सरकारे सत्तेवर आली. पण जेव्हा लोकशाहीत शासन व्यवस्था दुर्बल बनते तेव्हा असंसदीय व्यवस्था प्रबळ बनतात व भारतातही हेच घडले . या कालावधीत निवडणुक आयोग कार्यक्षम व स्ट्रॅाग बनलेले दिसते. 'टि.एन. शेषन' यांचा गाजलेला कालखंड या दरम्यानचाच होता. नंतर सत्तेवर आलेल्या 'नरसिंहराव' शासनाच्या काळात खासदारांचा घोडे बाजार सुरु होवून लोकशाहीची अब्रु वेशीवर लटकविण्याचे काम झाले. या नंतर 'अटल बिहारींच्या' काळात सुध्दा 'तहलका' या वृत्तसंस्थेने खासदारांना लोकसभेत पैसे घेतल्याचे दाखवुन लोकशाही व्यवस्थेत किती अपप्रवृत्ती घुसल्या आहे याचे दर्शन घडविले. सध्या मनमोहन सिंग यांचे सरकार सत्तेवर आहे पण या सरकारने सुध्दा भ्रष्टाचाराची सर्व रेकॅार्डस् तोडली आहेत. रोज भ्रष्टाचाराचे एखादे तरी प्रकरण बाहेर येते. त्यामूळे आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची प्रतीमा मलीन झाली आहे. आज देशात विकासाच्या राजकारणा ऐवजी लोकानुनयी राजकारण होताना दिसते आहे. आज देशातील सर्व राजकीय पक्षांच्या अजेंडयावर विकासाच्या मुद्दयाऐवजी जातिय आरक्षण, धर्मिक अस्मिता, मंदिर या सारखे मुद्दे आहेत. त्याच प्रमाणे आज देशातील सर्व राजकीय पक्षांनी देशातील महापुरुषांच्या विचारांचा खुन करुन त्यांचे प्रतिमीकरण केले आहे.

भारतीय संसदीय प्रणालीची अब्रु वेशीवर टांगल्याचे अगदी अलिकडचे उदाहरण दयावयाचे झाल्यास तेलंगणा' राज्य निर्मितीवरुन काही खासदारांनी संसदेत घातलेला गोंधळ हे त्याचे उत्तम उदाहरण म्हणूण सांगता येईल.आज भारतीय जनतेला आपले प्रश्न सोडविण्यासाठी संसदेपेक्षा न्यायव्यवस्था विश्वासहार्य संस्था वाटते आहे व न्यायव्यस्थाही सक्रीय बनलेली दिसत आहे. जी कायदेनिर्मितीची कार्य संसदेने करणे अपेक्षीत आहे त्या कायदेनिर्मितीच्या प्रक्रीयेत न्यायालयाने निर्देश देणे हे खरे तर भारतीय संसदीय व्यवस्थेचे आपयशच म्हणावे लागेल. खरे तर भारतात लोकशाही स्विकारण्याचा उद्देश हा समाजातील तळागाळातील उपेक्षित,दुर्बल घटकांचा विकास व्हावा त्यांना आपल्या प्रगतीची संधी मिळावी हा होता. पण भारतीय लोकशाहीचा विकास अपणाला वेगळयाच वाटेने चालेला दिसतो. लोकशाही व्यवस्थेला भ्रष्टाचाराच्या रोगाने ग्रासले आहे. अलिकडील कालाावधीत 'अण्णा हजारे' यांच्या नेतृवाखाली भ्रष्टाचाराच्या विरोधी आंदोलन झाले .या अंदोलनाला समाजाच्या सर्व स्थरांतुन पाठिंबा मिळाला भारतातील नवमध्यमवर्ग प्रथमच या निमित्ताने रस्त्यावर उतरला हि भारतीय लोकशाहीसाठी अनुकूल घटना आहे. कारण कोणत्याही देशात मध्यमवर्ग जितका व्यवस्थेप्रती जिज्ञासु असतो ते त्या व्यवस्थेच्या, देशाच्या विकासाला हितकारक असते. भारतात भ्रष्टाचाराची जी किड लागलेली आहे ती नष्ट करण्यासाठी खरे तर कोणत्याही नविन व्यवस्थेची, संस्थेची गरज नाही तर जनतेनेच आपल्या अधिकाराप्रती जागृत होणे आवश्यक आहे हेच खरे. शेवटी भारतीय लोकशाहीची संस्कृती, दिशा, दशा यांचा विचार करतांना आपणाला असे म्हणावे लागेल भारतीय संसदीय लोकशाहीमध्ये नेहरुंचा व शास्त्रींचा कालखंड सोडला तर सर्व शासन काळात मोठया प्रमाणावर लोकशाही मूल्यांची हानी झालेली दिसून येते.

***संदर्भ –***

१.कुलकर्णी सुहास,चंपानेरकर मिलिंद. 'असा घडला भारत', रोहन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१३.
२.व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, (अनुवाद-लेले चित्रा.) ' भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार'. डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम मराठी आवृत्ती २०१०.
३.पळशीकर सुहास, 'समकालीन भरतीय राजकारण, कॅाग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद', प्रतिमा प्रकाशन, पुणे.
४.सुहास पळशीकर,'राजकारणाचा ताळेबंद भारतीय लोकशाहीची वाटचाल'साधना प्रकाशन पुणे. आवृत्ती पहिलीः १५ ऑगस्ट २०१३.
५.डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे. 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण' पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर. दुसरी आवृत्तीः मार्च २०१०.
६.माधव गोडबोले, (अनुवादःसुजाता गोडबोले.) 'भारताच्या संसदिय लोकशाहीची अग्निपरिक्षा' राजहंस प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिलीः मे २०१२.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org